# टोळधाड

**नारायण धारप**

**समन्वय प्रकाशन, कोल्हापूर**

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

**टोळधाड : नारायण धारप**

© सुरक्षित

**प्रकाशक**
समन्वय प्रकाशन
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

**प्रमुख वितरक**
**अजब डिस्ट्रिब्युटर्स**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
मोबा. नं.: ९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे.

**आवृत्ती**
सप्टेंबर, २०१३

**किंमत**
रुपये १८०/-

**विज्ञानकथा म्हणजे काय?**

विज्ञानकथांच्या प्रत्येक संग्रहाच्या सुरुवातीस (प्रकाशक जर महत्त्वाकांक्षी असेल तर) एक प्रस्तावना असते आणि त्याची सुरुवात बहुधा या प्रश्नाने झालेली असते.

यातला वेगळेपणा, विशेषत्व तुम्हाला जाणवत नाही का?

सामाजिक, विनोदी, ऐतिहासिक, पौराणिक, ग्रामीणकथा वा युद्धकथा, हेरकथा, चातुर्य कथा, रहस्यकथा इत्यादी कोणत्याही प्रकाराच्या कथांच्या संग्रहाच्या सुरुवातीस त्या कथाप्रकाराचीच चिरफाड करणारी अशी प्रस्तावना सहसा आढळणार नाही किंबहुना नाहीच.

मग विज्ञानकथा संग्रहांचाच असा अपवाद का?

विज्ञान अधिक कथा, इतकं हे साधंसोपं नाही.

वैज्ञानिक विषय असलेली, वैज्ञानिक समस्या वा संकल्पना यावर आधारलेली एक कथा म्हणजे विज्ञानकथा ही व्याख्या सर्वमान्य का होऊ नये?

असं होत नाही, कारण प्रत्यक्ष विज्ञानकथा लेखकांच्यातसुद्धा त्या कथेच्या स्वरूपाबद्दल एकमत नाही.

विज्ञानकथेचे स्वरूप समजावून घेण्याचा एक मार्ग आहे. विज्ञानकथेचे सर्व बाजूंनी, सर्व कोनांतून अवलोकन करणे.

एक सत्य सर्वमान्य आहे. विज्ञानकथा हे एक बृहद्रेखन आहे. एक एक्स्ट्रॉपोलेशन आहे.

मग ते वर्तमानातून भविष्याकडे जाणारे असेल किंवा भूतकाळाकडे जाणारे असेल. (याक्षणीचे, नीतीचे वा स्वभावशास्त्राचे नियम शंभर किंवा दोनशे वर्षांनंतर वा पाचशेहजार वर्षांपूर्वीच्याही काळात तसेच लागू पडतील या गृहितात तर धोका अर्थात आहेच!)

विज्ञानकथांतून या घटकेच्या, या समाजातल्या धोक्याच्या, वा अडाणीपणाच्या, वा उधळेपणाच्या वा विचित्र तर्कदुष्ट प्रथांचा, समजुतींचा किंवा वहिवाटींचा तर्कशुद्ध शेवट दाखवलेला असतो. (कधी विनाशकारी, क्वचित प्रसंगी हास्यास्पदही!)

शास्त्रीय प्रगतीची, नव्या शोधांची, नव्या तंत्रज्ञानाची घौडदौड क्वचित प्रसंगी आपला श्वास रोखून घेते, मति कुंठित करते. तर टॉफ्लरसारख्या एखाद्या निराशावादी समीक्षकाने रंगवलेल्या दु:खान्त शेवटाने (फ्यूचर शॉक) जीव एकदम धास्तावतो. विज्ञानकथा हे दाखवते की प्रत्येक नवीन शोधाबरोबर किंवा उपपत्तीबरोबर संदर्भाच्या जुन्या चौकटी विस्कटतात, नवीन संदर्भ त्यांची जागा घेतात, शास्त्राच्या प्रगतीचा

अहवालात्मक आलेख रुक्ष वाटतो. विज्ञानकथेत त्याला मानवी क्रियाप्रतिक्रियांनी एक आकर्षक, स्वीकार्य स्वरूप येतं.

विज्ञानकथा केवळ शास्त्रांची प्रगतीच रंगवते असं नाही. कधी कधी नैसर्गिक उत्पातांचंही चित्रण करते. 'ग्रीन हाऊस' परिणाम थांबवता आला नाही तर? पृथ्वीचं सरासरी तापमान वाढलं तर? ध्रुवांवरील बर्फ वितळवून सागराची पाण्याची पातळी वाढली तर? किंवा ओझोनचा थर विरळ झाल्याने अल्ट्राव्हायोलेट किरणांच्या वर्षावाने त्वचाकर्करोगाची लागण झाली तर? सर्वसाधारणपणे गुरू आणि मंगळ यांच्या कक्षांच्या मध्ये फिरणारा एखादा ग्रहखंड (ॲस्टेरॉईड) पृथ्वीवर आदळला किंवा पृथ्वीच्या अगदी जवळून गेला तर? यातील काही आपत्ती मानवानेच निर्माण केलेल्या आहेत, काही दैवी आहेत.

थोडक्यात सांगायचं तर बदल-क्रांती-उत्क्रांती हा विज्ञानकथेचा आत्मा आहे. विज्ञानकथा हा असा एकमेव कथाप्रकार आहे की ज्यात सर्व पार्श्वभूमीच बदललेली असते. चंद्रावरती वसाहत, रित्या अवकाशात फिरणारे अवकाशस्थानक, पृथ्वीवर राक्षसी प्राण्यांचे आगमन, प्रचंड सर्वस्वाहाकारी स्फोटानंतरची उद्ध्वस्त पृथ्वी-शक्यता खरोखर असंख्य आहेत. पण एक नक्की. या क्षणीचा, या स्थळीचा समाज वा मानव विज्ञानकथेत नसतो.

वरील अल्प विवेचनावरून विज्ञानकथेच्या सर्वसामान्य स्वरूपाची कल्पना यायला हरकत नाही.

**विज्ञानकथा काय नाही?**

विज्ञानकथा ही जादूची कथा, नवलकथा किंवा परिकथा नाही. विज्ञानकथेतही लोहाचे सुवर्ण होईल. पण ते परीसस्पर्शाने किंवा जादूची कांडी फिरवून होणार नाही, तर अणुगर्भावर शक्तिशाली कणकिरणांच्या वर्षावाने होईल. विज्ञानकथेतला नायक अदृश्य होईल, पण हातात जादूची अंगठी घातल्याने नाही, तर शरीराचं रिफ्रॅक्टिव्ह इंडेक्स बदलल्याने होईल.

विज्ञानकथा ही कविकल्पना नाही. त्यातल्या घटना अशक्य किंवा असंभवनीय कधीही नसतात. तेथे आजच्या शास्त्रातले सर्व ज्ञात नियमच कार्य करीत असतात.

विज्ञानकथा तर्काचा आधार कधीही सोडत नाही.

**विज्ञानकथेचा मुख्य साहित्यप्रवाहात स्वीकार का झालेला नाही?**

प्रचलित साहित्याने मानदंड कलाशाखेतील (ह्यूमॅनिटीज) तज्ज्ञांनीच ठरवले आहेत. विज्ञानकथा ही इतर कथांतून सर्वस्वी वेगळी असल्याने हेच निकष तिला लावले गेले तर त्यात ती हमखास उणी पडते. समाजशास्त्र, मानसशास्त्र, सौंदर्यशास्त्र, भाषाशास्त्र यांचा अगदी गाढा विद्वानही केवळ एखादा दुसरा संग्रह वा कादंबरी वाचून त्यावर अधिकृत मत देऊ शकेल का?

याच कारणाने साहित्यग्रामातील ब्रह्मवृदांने विज्ञानकथेचा स्वीकार केलेला नाही, ती अजून गावाच्या वेशीबाहेरच आहे.

**विज्ञानकथेवरील टीका आणि तिचे टिकाकार.**

**विज्ञानकथा पलायनवादी आहे का?**

विज्ञानकथेवरील हा सर्वात गंभीर आरोप आहे. एका अर्थी सर्वच कला पलायनवादी असतात. त्यांच्या आस्वादात माणूस काही क्षण स्वत:ला विसरून जातो म्हणून संगीत, सृष्टिसौंदर्य, आकर्षक शारीरिक कसरत, कौशल्यपूर्ण खेळ या सर्वांनाच पलायनवादाचा शिक्का मारायचा का?

मानव हा बदलाचा भोक्ता आहे. अपरिहार्यतेसारखा इतर कशाचाही त्याला वैताग येत नाही. अनपेक्षिततेची, आश्चर्याची, नवलाची ही भूक बालपणी प्रच्छन्न रूपात असते; मोठेपणी ती काळजाच्या आतल्या कप्प्यात, लोकांच्या नजरेआड दडपून ठेवलेली असते. ती भूक भागवण्याचे कार्य विज्ञानकथा करते. वाटलं तर याला कॅथार्सिस म्हणा, परोक्षानुभव म्हणा, काहीही म्हणा.

शास्त्रीय नियमांना बाधा न आणता, तर्कशुद्धतेवरील आपल्या विश्वासाला धक्का न लावता, विज्ञानकथा ही भूक भागवते.

**शास्त्रज्ञांकडून होणारी टीका :**

काही सामान्य अपवाद वगळता शास्त्रज्ञांचा विज्ञानकथेला विरोध दिसून येतो. त्यांनी असा काही गैरसमज करून घेतलेला असतो की, विज्ञानकथा म्हणजे भविष्यकथन (प्रोफेसी, ज्योतिष) आहे विज्ञानकथा तशी नाही. अणुबॉंब, पाणबुडी, पेरीस्कोप, रणगाडे, विमाने, आकाशयाने, अवकाशस्थानके इत्यादींची वर्णने विज्ञानकथांतून आधी आली होती हे सत्य आहे; पण ते अपवाद आहेत. विज्ञानकथांतून अशा हजारो गोष्टी वर्णिल्या गेल्या आहेत की ज्या सत्यसृष्टीत कधीही आल्या नाहीत, कधी येण्याची शक्यताही नाही. पण हा काही त्या कथेचा दोष नाही. कारण कथा त्यासाठी लिहिली

गेलीच नव्हती.

विज्ञानकथेत वर्णन केलेला समाज वा संकल्पित तंत्रज्ञान अस्तित्वात यावयालाच पाहिजे अशी काही अट नाही, शक्यताही नाही.

वैकल्पिक शक्यतांचे भविष्यकाळ सादर करणे एवढाच विज्ञानकथेचा हेतू असतो. कथापरिपोषासाठी स्वीकारलेल्या अनेक गृहितांपैकी ते एक असतं.

**विज्ञानकथेतून सर्वसामान्यांचं प्रबोधन होत नाही, असाही आरोप केला जातो.**

ज्याकरिता विज्ञानकथा लिहिली गेलीच नाही ते साध्य होत नाही असा दावा अन्यायकारक आणि फोल आहे. शास्त्रीय उपपत्ती समजावून सांगणारे उदंड ग्रंथ उपलब्ध असतात. शिवाय साप्ताहिके, मासिके, वार्षिके यांतून विज्ञानावर अनेक लेख येत असतातच. विज्ञानकथेतील विज्ञान हे काल्पनिक व अशक्य असतं असाही एक शेरा मारण्यात येतो. मला एक सांगा, ग्रामीण कथेवरून कोणी शेतीशास्त्र शिकला आहे का? ऐतिहासिक कथा वाचून कोणी मराठी-इंग्रजी मोगली अम्मल वा तह लढायांच्या सनावळी शिकला आहे का? विज्ञानकथा ही निखळ मनोरंजनासाठी आहे ही साधी गोष्ट का स्वीकारली जात नाही?

त्याचप्रमाणे विज्ञानकथा अतिउत्साही, अविवेकी, अतिरंजित, एकांगी असते असा एक मतप्रवाह आहे.

काही कथांच्या बाबतीत या आरोपात काही प्रमाणात तथ्य आहे हे मान्य आहे. पण एक ध्यानात घ्या. विज्ञानकथेची ही प्रारंभीची अवस्था आहे. तिची जडणघडण चालू आहे. काही काळ गेल्यानंतर, अनुभवाने प्रौढत्व आल्यानंतर विज्ञानकथांतील हा दोष नक्कीच कमी होईल.

विज्ञानकथा तंत्रात व मांडणीत कंपूशाही असते, असे म्हटले जाते.

मराठी विज्ञानकथांत ही बाब फारशी महत्त्वाची नाही, पण पाश्चात्त्य विज्ञानकथांवर हा आक्षेप घेतला जातो. आयन ड्राइव्ह, हायपरस्पेस, ई.टी. एस्पर, एकटीएल ड्राइव्ह, पॉसिट्रॉनिक ब्रेन, सायबर हे व यासारखे अनेक परवलीचे शब्द वापरलेले असतात. सर्वसामान्य वाचकांना हे सर्व अनाकलनीय, दुर्बोध वाटते.

लेखक म्हणून लिहिताना मला (व माझी खात्री आहे इतरही अनेक वि. क. लेखकांना) हा प्रश्न सतावतोच. एखादी वैज्ञानिक समस्या मांडताना त्यातील कठीण चाकोरीबाहेरच्या संज्ञांचे, संदर्भांचे स्पष्टीकरण देत देत कितपत मागे जायचं? का तळटीपांसारखा एखादा हास्यास्पद प्रयत्न करायचा? ही अडचण अनुभवसिद्ध आहे,

काल्पनिक नाही. पण वाचकांच्या बाजूने येणारी अडचणही खरी आहे. विज्ञानकथा लेखक असा वापर जाणूनबुजून किंवा कृत्रिम दुर्बोधता आणण्यासाठी किंवा एक प्रतिष्ठेचा प्रश्न म्हणून करीत नाहीत. या संज्ञा, हे संदर्भ त्यांना सवयीने सेल्फ एक्स्प्लनेटरी झालेले असतात.

वाचकांना एक सूचना व दिलासा आहे. जसं जसं जास्त जास्त विज्ञानकथेचं वाचन होत जाईल तस तसे हे संदर्भ वा संज्ञा वा उपपत्ती आपोआप स्पष्ट होतात असा अनुभव येईल.

पण तरीही या मुद्यावर एखादा सुवर्णमध्य हवा.

विज्ञानकथांतील पात्रांच्या व्यक्तिरेखा, अस्पष्ट, धूसर, अपुऱ्या असतात. पात्रं ठोकळेबाज वाटतात.

विज्ञानकथा ही मूलत: घटनाप्रधान कथा आहे. एखाद्या कथेत पात्रं खरोखरीच सजीव, ठसठशीत झाली तर वाचकांचे लक्ष कथेतील घटनांवरून पात्रांकडेच आकर्षित होऊन कथेच्या प्रभावावर परिणाम होण्याची शक्यता आहे.

विज्ञानकथा ही बहुधा मोठ्या समूहाच्या प्रतिक्रियांचं दर्शन घडवते. उदा. एखाद्या गावावर, शहरावर, राष्ट्रावर, खंडावर वा सर्व पृथ्वीग्रहावरच कोसळू पाहणारे एखादे विनाशकारी संकट,... अर्थातच एकाच व्यक्तीच्या संज्ञाप्रवाहास किंवा अंत:प्रेरणांना, किंवा स्वभावाच्या जडणघडणीला, वा प्रतिक्रियांना जरा कमी महत्त्व असतं.

कोणत्याही कथेत काय सांगितले आहे व कसे सांगितले आहे या दोन बाजू आहेत. वाचकांचं लक्ष खिळवून ठेवणाऱ्या घटना हा विज्ञानकथेचा आत्मा आहे. विज्ञानकथा लेखकांनीही ओघवती भाषा, चटकदार संवाद, पात्रांची सजीवता, पात्रांचा तोल यांकडे आवश्यक ते लक्ष द्यावयासच हवे. लेखनशैली व पात्रांचे लेखन हा मुद्दा महत्त्वाचा नसला तरी दुर्लक्ष करण्यासारखा खास नाही.

विज्ञानकथा वाचणारांच्या ध्यानात एक गोष्ट सहज आली असेल. विज्ञानकथेत पात्रांपेक्षा पात्रांची प्रतीके वावरतात. शूर, हिकमती, निधडा, बुद्धिमान नायक; त्याचा इमानी, विश्वासू, जिवास जीव देणारा साथीदार; आणि विरोधात हिंस्र, अमानवी क्रूर, आक्रमक, रहस्यमय शक्तीचा आविष्कार. थोडक्यात मानवता विरुद्ध 'क्ष' असा संघर्ष असतो. हा 'क्ष' काहीही असेल. एखाद्या अज्ञात जिवाणूमुळे पसरलेली प्लेगसारखी साथ; एखादा क्रांतिकारी शोध, अभेदीनीय प्राण्यांचे आक्रमण, मानवाविरुद्ध बंड करून उठलेली गणकयंत्रे, आण्विक किरणांनी उत्क्रांत

झालेले अतिविशाल वा अतिबुद्धिमान प्राणी; ही यादी न संपणारी आहे.

**विज्ञानकथेचे लेखक आणि लेखन**

विज्ञानकथा लेखनात हेवा वाटण्यासारखा मोबदला नाही, भरपूर प्रसिद्धी नाही, खूप मोठ्या संख्येने वाचक नाहीत, करारनामे घेऊन मागे धावणारे प्रकाशक नाहीत-तरीही विज्ञानकथा लेखक तोच वाङ्मयप्रकार का हाताळतात? एक कारण हे असणार की सुबुद्ध, सुजाण वाचकांची पसंती मिळविण्यात एक खरे समाधान मिळते.

विज्ञानकथा लेखनात अव्यक्त मनाचा मोठा भाग असतो. अंतर्मनातल्या सुप्त इच्छा ज्याने पूर्ण होतात तिकडे आपण आकर्षिले जातो. कोणतीही कथा ही शेवटी प्रतिमांची आणि संकेतांची मांडणी असते. विज्ञानकथांमधल्या प्रतिमा आणि संकेत अंतर्मनातून साकार झालेले असतात. कालप्रवास, उडत्या तबकड्या, प्रकांड शक्तिशस्त्रे, त्रिकाळावर आणि त्रिखंडावर प्रभुत्व, देवासमान शक्ती साध्य होणे अशासारख्या सुखद स्वप्न कल्पनांबरोबरच भयप्रद आकारांनी केलेले पाठलाग, विनाशाकडे चाललेली घसरडी वाट हेही भयप्रद अनुभव सुप्त इच्छांचीच प्रच्छत्र स्वरूपं आहेत.

(आणि यांच्यामुळेच विज्ञानकथांवर सत्यसृष्टीपासून पलायन, सत्यसृष्टीशी फारकत, सत्यसृष्टीचे चित्रण नाही हे आरोप होतात!)

विज्ञानकथेचं लेखन कठीण आहे. पाहा. सर्वसामान्य वाङ्मयातील पार्श्वभूमी वाचकाला परिचित असते. गाडी-विमान-मोटार अशी वाहने, शहरे रस्ते, रहदारी, गाय-मांजर-कुत्रा यासारखे पाळीव किंवा वाघ-सिंह-चित्ता यांसारखे जंगली प्राणी, नागरी व्यवहार, इत्यादींचे वर्णन अनावश्यक असते. एखाद्या मध्ययुगीन वा ऐतिहासिक वा प्राचीन पौराणिक कांदबरीतील समाज व संदर्भ हे सुद्धा वाचकांना सहज आकलनीय असतात.

ही सुविधा विज्ञानकथेला नाही. विज्ञानकथेतील शहरे, समाज, वाहने, नियम, सर्व अपरिचित, वेगळं असतं. आताचं, या घटकेचं नाही आणि हा फरक सुरुवातीपासूनच समजावून सांगितला पाहिजे. आणि हे कथासूत्रात, घटनाप्रवाहात बाधा न आणता. कथेत वावरणाऱ्या पात्रांना ती पार्श्वभूमी परिचित असते. ती संभाषणातून, पुस्तकांतील उताऱ्यांतून किंवा कोणती तरी क्लृप्ती वापरून वाचकांना सुस्पष्ट स्वरूपात ज्ञात करून देण्यात विज्ञानकथा लेखक यशस्वी झाला पाहिजे. हे काम सोपे नाही. त्यासाठी खूप परिश्रम आणि दीर्घ उमेदवारी आवश्यक आहे.

गर्वाचा वा दर्पोक्तीचा स्पर्शही न होता मी ठामपणे असं विधान करू शकतो की यशस्वी विज्ञानकथा लेखक इतर वाङ्मयप्रकार सुलभतेने हाताळू शकेल, पण याउलट होणं जवळजवळ अशक्यच आहे. वाचकांना सतत नवनवीन अपेक्षित असते. विज्ञानकथा लेखकाला दर वेळी नवीन पार्श्वभूमी निवडून उभी करावी लागते. ही अडचण अर्थात इतर कोणत्याही वाङ्मयप्रकारापुढे उभी नसते.

**विज्ञानकथांचे प्रकार**

विज्ञानकथांतील कल्पना इतक्या विविध मार्गांनी हाताळल्या गेल्या आहेत की त्यांचे केवळ अत्यंत स्थूलमानानेच वर्गीकरण शक्य आहे. तरीही ज्यांनी आजवर चांगल्या विज्ञानकथा वाचलेल्याच नाहीत त्यांना हे ढोबळ रूपदर्शकसुद्धा फायद्याचे ठरावे. विज्ञानकथांतून डोकावणारी कथासूत्रे याप्रमाणे असतात.

या कथासंग्रहात विज्ञानकथांची ही कथासूत्रे गृहित धरून प्रत्येकावर थोडक्यात भाष्य व एक कथा अशी मांडणी केली आहे, हे ओघाने आलेच.

(१) अवकाश प्रवास
(२) कालप्रवास
(३) अमानवी/अभेदिनीय आक्रमणे
(४) यंत्रमानव, संगणक
(५) अतिंद्रिय शक्ती असणारे मानव
(६) वेगळ्या मिती
(७) समांतर मितीला किंवा काळाला भेट
(८) स्वैर कल्पनाविलास

विज्ञानकथांचे आशावादी आणि निराशावादी असे पुन्हा ढोबळमानाने दोन उपप्रकार आहेतच.

निराशावादी कथांतून मानवी संस्कृतीचा वा जातीचा वा पृथ्वीचा वा सर्व सूर्यमालेचाच संपूर्ण विनाश दाखवलेला असतो; तर दुसऱ्या प्रकारच्या आशावादी कथांतून सर्व समस्यांवर मात करणारा विजिगीषू मानव अल्पायुष्याची आणि सापेक्षता सिद्धांताची बंधने तोडून विश्वविजयावर निघालेला दिसतो. तारकासमूहांवर मानवी संस्कृतीचे साम्राज्य स्थापन करण्यासाठी ! चांगले-वाईट, योग्य-अयोग्य अशा कल्फनांतून नि:संदिग्ध, स्पष्ट निवड करणाऱ्या विज्ञानकथा या आजच्या घटकेच्या नीतीकथा मॉरल् स्टोरीज--आहेत ! भविष्यातील समाज आणि संस्कृती रंगवताना आजच्या

घटकेच्या नीतीशास्त्राचे प्रघात रूढी, परंपरा, नियम लागू पडणार नाहीत हे जाणून त्यांना पर्याय रचणारी विज्ञानकथा ही पहिलीच कथा आहे. त्या नव्या, अनोळखी प्रदेशातील हे प्रथम पदार्पण आहे. त्या प्रदेशात वाटाड्या नाही, तिथले पूर्वानुभव नाहीत.

विज्ञानकथांतून नीतीशास्त्र-समाजशास्त्र-राज्यशास्त्र हे येणारच. भविष्यात येणारे अपेक्षित बदल असतील, दुष्परिणाम असतील. प्रश्नांना काही चाचपडती उत्तरंही असतील, कदाचित ती योग्य वा बरोबर नसतीलही-पण विज्ञानकथालेखक त्या समस्या तरी निर्भीडपणे, नि:संदिग्धपणे मांडतील !

विज्ञानकथा वैज्ञानिक समस्या हाताळत असली तरी विज्ञानकथेतही शास्त्रज्ञांचे एक पात्र म्हणून रेखाटन परिपूर्ण वाटत नाही. एकूण मराठी (कदाचित परदेशीसुद्धा)वाङ्मयातच (डॉक्टर वगळता) शास्त्रज्ञ आणि त्यांच्या समस्या यांवरची निर्मिती क्वचितच आढळते. यामागचे मुख्य कारण हे असावे की ललितकला (ह्यूमॅनिटीज) आणि विज्ञान यांच्यात फार मोठी फारकत झालेली आहे. ललित लेखकाला शास्त्रज्ञ आणि संशोधक यांची पार्श्वभूमी, त्यांचे दैनंदिन आयुष्य, आपापसातील स्पर्धा आणि हेवेदावे, संशोधन कल्पनांची उत्पत्ती आणि उत्क्रांती, शास्त्रज्ञ संशोधकांच्या आशा आकांक्षा, त्यांची अंतिम ध्येये यांची काहीही कल्पना नसते.

आणि शास्त्रज्ञ ललित लेखक नसतात, नव्हे, होऊच शकत नाहीत, कारण त्यांचं सर्व शिक्षणच वेगळ्या मार्गाने झालेले असते. (अर्थात येथेही डॉ. जयंत नारळीकर, प्रो. फ्रेड हॉईल, डॉ. असिमॉव्ह यांच्यासारखे सन्मान्य अपवाद आहेतच.) संशोधकांच्या अहवालात 'काय झाले' याला महत्त्व असते. कोणी, कोणाला, का, हे प्रश्न नसतात. सर्व परिणाम पुन्हा पुन्हा तपासून पाहायचे असतात. त्यात कोणताही संदिग्धपणा नसतो. निष्कर्ष तर्कशुद्ध, सप्रमाण हवेत, कोणत्याही अंदाजाला जागा नसते. अशा संस्कारात वाढलेला संशोधक विज्ञानकथेसारखी संपूर्ण काल्पनिक, पुरावा-प्रमाण नसलेल्या उपपत्ती स्वीकारणारी, सिद्ध सत्याच्या वर्तुळाबाहेर वावरणारी निर्मिती कशी करू शकेल?

### विज्ञानकथांचे वाचक

कल्पनांचे वैचित्र्य हा विज्ञानकथेचा आत्मा आहे. ज्या एखाद्या समस्येवर विज्ञानकथा आधारलेली असते त्या समस्येचे गांभीर्य लक्षात येण्यासाठी, किंवा त्या रहस्यांची